*मुद्रा यशोगाथा*
*नाव :- श्री.किरण नामदेव भोसले व श्री.अमित दामोदर भोसले, जि.कोल्हापूर*
*व्यवसाय :- मे.ओम जेन्टस पार्लर, हेअर ड्रेसर्स आणि सलून*

## *मुद्रा किशोर कर्जाची यशोगाथा*

*संक्षिप्त माहिती :- श्री किरण नामदेव भोसले व श्री अमित दामोदर भोसले हे दोघेही केशकर्तन कारागीर म्हणून काम करत होते. त्यांच्या मनात स्वतःचे सलून सुरू करण्याचे होते परंतु भांडवलाअभावी त्यांना ते शक्य होत नव्हते. त्यांनी नोव्हेंबर २०१७ मध्ये बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा साळवण येथे संपर्क साधला व रूपये ६.७० लाखाचा प्रस्ताव सादर केला. यामध्ये बँकेकडून रुपये ५ लाख व स्वभांडवल रू. १.७० लाख असा प्रस्ताव होता. बँक अधिका-यांनी व्यवसायाच्या ठिकाणी पाहणी केल्यावर या होतकरू नवयुवकांना पंतप्रधान मुद्रा किशोर योजनेअंतर्गत रूपये ५ लाख कर्ज मंजूर केले व स्वतंत्र व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली. या कर्ज प्रकरणाकरीता त्याना जामीनदार अथवा तारण देण्याची गरज पडली नाही. मिळालेल्या संधीचा लाभ उठवत या तरूणांनी एप्रिल २०१८ मध्ये ओम जेन्टस् पार्लर चे उद्‌घाटन करून व्यवसायास सुरूवात केली. आज त्यांच्याकडे तीन सलून चेअर असून या परिसरातील एक अद्ययावत सलून म्हणून प्रसिद्धी मिळाली व या व्यवसाय निमित्ताने नवीन रोजगार निर्मिती देखील केली. त्यांची रोजची कमाई रुपये २५०० ते ३००० इतकी आहे. या यशाचे श्रेय ते प्रधानमंत्री मुद्रा योजनेला देतात.*

